## <u>निशाणी क्र. २१ वरील आदेश</u>

१. प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादीने कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीचे अर्जात कथन असे की, प्रतिवादी क्र २ ते ४ हे अशिक्षित असून प्रतिवादी क्र १ यास सही पुरते लिहिता वाचता येते त्यांना अशिक्षितपणामुळे मुदतीमध्ये कागदपत्र आढळून आले नाहीत. प्रस्तुत दावा हा सीावर मिळकतीबाबत वाटपाचा आहे. प्रतिवादीची कैफियत नाकारलेस त्याचे कायदेशीर कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे.

२. सदरच्या अर्जावर म्हणणे दाखल केले असून वादीनी अर्जास तीव्र हरकत घेतली आहे. वादीने पुढे कथन केले आहे की, प्रतिवादीच्या अर्जातील मजकूर वादीस मान्य नाही. वादीस त्रास व्हावा याकरिता मुदतीत कैफियत दिलेली नाही. वादीस २०,००० रुपये इतका खर्च नुकसान झालेले आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा. मंजूर झाल्यास कॉस्ट मिळावी.

३. दोन्ही पर्क्षांचा युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा हा वाटपासाठी व निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करण्यासाठी विलंब झालेला आहे. सदर प्रतिवादी हे दिनांक ३०/०९/२०२२ रोजी सदर दाव्याच्या कामास्तव हजर झालेले होते त्यांनी मुदतीत कैफियत दाखल करणे अत्यंत आवश्यक होते. परंतु दाव्याचे स्वरुपा पाहता दावा हा गुणदोषांवर निकाली होणेकरीता दोन्ही पक्षांचे म्हणणे विचारात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे नैसर्गिक न्याय तत्ववाचा विचार करता प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरणार आहे. त्यामुळे मी त्याकरिता खालील आदेश पारित करीत आहे.

### <u>आदेश</u>

१) प्रस्तुत अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब रु. २००/— इतक्या खर्चासह माफ करण्यात येत आहे.

३) प्रतिवादी यांनी वर नमूद खर्चाची रक्कम वादी यांना दयावी असे आदेशित करण्यात येते.

४) वादी यांना खर्चाची रक्कम दिल्यानंतर प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

सही/—

(श्रीमती गायत्री एस. पाटील)

दिनांक : ०५/१२/२०२३

३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
बार्शी, जि. सोलापूर.

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same word to word as per original Judgment/order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | **S.V. Kokate (Grade III)** |
| Name of the court | : | **Gayatri S. Patil** |
| | | **3rd Jt. CJJD & JMFC,** |
| | | **Barshi, Dist. Solapur.** |
| Judgment/order declared on | : | **05/12/2023** |
| Judgment/order signed by Presiding officer | : | **05/12/2023** |
| Judgment/order uploaded on | : | **06/12/2023** |